'साप्ताहिक शब्दरुतू'चे वार्षिक वर्गणीदार होण्यसाठी क्यूआर कोडवर वार्षिक किंवा मासिक योजनांचे पेमेंट करून मो. ९०११२०१४१४ या व्हाट्सॲप नंबरवर स्क्रिनशॉट व आपला पूर्ण पत्ता पाठवावा.
**वार्षिक वर्गणी : १८० । मासिक वर्गणी : १४**

# शब्दरुतू

पोस्टल परवाना नं. SRP/136/2023-2026
**कार्यकारी संपादक : सुमीत लांडे, मुंबई**
संपर्क : मो. ९०११२०१४१४
Email ID : shabdarutu@gmail.com

## पवारांची महिला अधिकाऱ्यास फोनवरुन दादागिरी

**सोलापूर :** राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिस्तप्रीय नेते म्हणून ओळख असलेल्या अजित पवारांनी एका महिला पोलीस अधिकाऱ्यास फोनवरुन दादागिरी केली. अजित पवारांच्या या संवादाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, माध्यमांत हे वृत्त झळकल्यानंतर आता संबंधित गावातील शेतकरी आणि फोन लावणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. त्यामुळे, अखेर अजित दादांना अडचणीत आणणाऱ्या कुडू येथील १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याचं दिसून आलं.

* वर्ष २ रे * अंक ४९ वा * रविवार दि. ०७ सप्टेंबर २०२५ (Decl.Regd.No. SR/MAG/11/2021) RNI.NO.MAHMAR/2021/84232 पाने ४ * किंमत ४ रु. साप्ताहिक (Weekly)

# गणपती बाप्पाला निरोप द्यायला वरुणराजाची हजेरी

**मुंबई :** तमाम महाराष्ट्राचे लाडके आराध्य दैवत असलेल्या गणरायाला शनिवारी अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर निरोप दिला जाणार आहे. आज मुंबईतील तब्बल ६५०० सार्वजनिक मंडळे व दीड लाख गणेश मूर्तींच्या विसर्जन मिरवणुका (२०२५) आज निघणार आहेत. विसर्जन मार्गावर चोख पोलीस बंदोबस्त तैनात राहणार असून गर्दीच्या ठिकाणी एकूण १० हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. तब्बल २५ हजार पोलीस कर्मचारी डोळ्यात तेल घालून पहारा देतील. तर मुंबई महानगरपालिकेचे १० हजार कर्मचारीही तैनात असतील. यंदा गणपती बाप्पाला निरोप देण्यासाठी पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. कालपासून मुंबईत जोरदार पाऊस सुरु आहे. मुंबईत सतत पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. आज पहाटेपासून मुंबईत पावसाची संततधार आहे. मुंबईच्या आकाशात काळ्या ढगांनी गर्दी केल्यामुळे पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या अंदाजानुसार शनिवारी मुंबईत कालप्रमाणेच पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे. दक्षिण मुंबईत रिमझिम पाऊस पडेल तर मुंबई उपनगरात मध्यम स्वरुपाचा पाऊस असेल. शुक्रवारप्रमाणेच शनिवारीही पावसाचे वातावरण कायम राहील. सोमवारनंतर मात्र पाऊस उघडीप देईल, असा अंदाज आहे. त्यामुळे आज गणपती विसर्जन मिरवणुकीत पावसाची हजेरी एकीकडे नाचणाऱ्यांचा आनंद द्वगुणित करणारी असेल. मात्र, त्याचवेळी सतत पाऊस सुरु राहिल्यास गणपतीच्या मूर्त्यांना झाकून न्यावे लागेल. तसेच गणपतींच्या प्रवासाचा वेगही मंदावण्याची शक्यता आहे.


मुंबईत गणेशगल्लीचा गणपती (पान २ वर)



## नवी कोरी पुस्तकं




**टिकली तर टिकली**
: लेखकाचे नाव :
**श्रद्धा बेलसरे-खारकर**
किंमत रु. : १५०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**




**आणिक टीकास्वयंवर**
: लेखकाचे नाव :
**संपा. सद्रे/करोगल**
किंमत रु. : २८०/-
: प्रकाशन :
**शब्दालय प्रकाशन**

# शिक्षणातील त्रिभाषा धोरण ठरवणार समिति

## डॉ. मोरे-केंद्रे यांच्यासह आठ सदस्य, अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव



**मुंबई :** नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण लागू करताना कोणत्याही सहभागी घटक विचारात न घेण्याचा सरकारचा निर्णय अंगलट आल्यावर डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने स्थापन केलेल्या त्रिभाषा धोरण समितीच्या सदस्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. ही समिती स्थापन करताना समितीला अभ्यासासाठी तीन महिन्यांची मुदत दिली होती. त्यापैकी अडीच महिने उलटून गेल्यावर सरकारने या समितीत सात नव्या सदस्यांची नेमणूक केली आहे. यात डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डेक्कन कॉलेजच्या भाषा विज्ञानप्रमुख सोनाली कुलकर्णी-जोशी आदींचा समावेश आहे.

राज्य सरकारने काही महिन्यांपूर्वी त्रिभाषा धोरणाचा भाग म्हणून इयत्ता पहिलीपासूनच तिसरी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक अशा सर्वच स्तरांमधून कडाडून विरोध झाला. या मुद्द्यावरून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघे प्रदीर्घ काळानंतर पहिल्यांदा एकाच राजकीय व्यासपीठावर एकत्र आले. त्यानंतर राज्य सरकारने यंदा शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा लागू होणार नसल्याची माघार घेतली. मात्र डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिभाषा धोरण (पान २ वर)

# ज्यांच्याकडे पुरावा तेच कुणबी

## फडणवीस : हैदराबाद गॅझेटियरचा जीआर सरसकट नाही

**मुंबई:** छगन भुजबळ हे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतून कुठेही गेले नाहीत. त्यांची व माझी चर्चा झाली आहे. मी त्यांना आश्वस्त केलं आहे की आपल्या सरकारने जी अधिसूचना (जीआर) काढली आहे त्याने ओबीसी समाजावर कुठलाही परिणाम होणार नाही, कारण हा सरसकट जीआर नाही. हा केवळ पुराव्याचा जीआर आहे, असे स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भुजबळ यांच्या नाराजीच्या चर्चेवर बोलताना दिले.




मराठा आंदोलकांच्या मागणीनंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियरचा स्वीकार करून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासकीय अधिसूचना (जीआर) काढली आहे. परंतु, याला काही ओबीसी नेत्यांनी, संघटनांनी विरोध केला आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी देखील या जीआरवार आहेप नोंदवला आहे. या जीआरविरोधात न्यायालयात धाव घेणार असल्याचं भुजबळ यांनी स्पष्ट सांगितलं आहे. दरम्यान, सदर जीआरसंदर्भात राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली तेव्हा भुजबळ त्या बैठकीतून निघून गेल्याची चर्चा आहे.

त्यामुळे मुख्यमंत्री म्हणाले, मराठवाड्यात इंग्रजाचं राज्य हतं. मराठवाड्यात निजामाचं राज्य होतं. त्याम राठवाड्यातील जातींसदर्भातील पुरावे हे इतर ठिकाणी मिळत नाहीत, ते केवळ निजामाकडेच म्हणजेच हैदराबाद गॅझेटमध्ये सापडतात. आपण तिथले पुरावे ग्राहा घरले आहेत. त्या पुराव्यांनुसार जे खरे कुणबी आहेत त्यांनाच हे प्रमाणपत्र मि ळणार आहे. त्यामुळे मला असं वाटतं की ज्यांचा हक्क आहे अशांनाब लाभ मि ळेल. कोणालाही खोटेपणा करता येणार नाही, असा हा जीआर आहे.

अनेक ओबीसी संघटनांनी सरकारच्या जीआरचं स्वागत केलं आहे. अनेक ओबीसी नेत्यांनी स्पष्ट केलं आहे की या जीआरबाबत (पान २ वर)

## संक्षिप्त

### परकिय मुद्रा भंडार व सोने साठ्यात वाढ

**मुंबई ।** भारतातील अर्थव्यवस्थेसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताचा परकीय मुद्रा भंडार आणि सोने साठा दोन्ही मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकने दिलेल्या माहितीनुसार, २९ ऑगस्ट २०२५ ला संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय मुद्रा भंडार तब्बल ३.५१ अब्ज डॉलर्सने वाढून ६९४.२३ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. त्याआधीच्या आठवड्यात तो ६९०.७२ अब्ज डॉलर्सवर घसरला होता.

# पंतप्रधान मोदींशी माझी मैत्री कायम राहिल : ट्रम्प

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सहकारी गेल्या काही महिन्यांपासून भारताविरोधात टिप्पणी करत होते. या टीकेच्या मालिकेला शुक्रवारी विराम मिळाला. चीनमध्ये पंतप्रधान मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीनंतर डोनाल्ड ट्रम्प यांचे सूर बदलले. शुक्रवारी त्यांनी म्हटले की, पंतप्रधान मोदींशी माझी मैत्री कायम राहिल, ते एक चांगले पंतप्रधान आहेत. यावर आता पंतप्रधान मोदींनीही आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



राष्ट्राध्यक्ष ट्रम्प शुक्रवारी म्हणाले होते की, माझी आणि मोदींची मैत्री कायम राहिल. ते एक उत्तम पंतप्रधान आहेत. भारत आणि अमेरिकेचे विशेष नाते आहे. यात काळजी करण्यासारखे काही नाही. ते काही महिन्यांपूर्वी इथे आले होते. तेव्हा आम्ही एकत्र रोज गार्डनमध्ये गेलो होतो.

भारताला तुम्ही गमवले आहे का? असा प्रश्न राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी हे उत्तर दिले होते. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या एक्स हँडलवर पोस्ट शेअर करत ट्रम्प यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, ''भारत-अमेरिका संबंधाबद्दल डोनाल्ड ट्रम्प यांनी जी सकारात्मकता दाखवली आणि त्यांच्या भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल आभार. आम्ही त्यांच्या भावनांशी सहमत आहोत. जागतिक धोरणात्मक भागीदारी आणि भविष्याकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन यामध्ये भारत (पान २ वर)

## १ कोटी ६० लाख रुपयांची फसवणूक

**अहिल्यानगर :** जादा परताव्याचे गोडवे गाऊन तब्बल १ कोटी ६० लाख रुपयांची गुंतवणूकदारांची फसवणूक झाली आहे. इनफिनाईट बिकन इंडिया प्रा. लि. आणि ट्रेड्स इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. या कंपन्यांनी '१० ते १२ टक्के परतावा' मिळेल, असे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना गंडवले. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दसरा मेळाव्यात राज-उध्दव एकत्र दिसणार

**मुंबई :** येत्या काही दिवसांमध्ये होऊ घातलेल्या ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यात एक मोठी राजकीय घडामोड घडण्याची शक्यता आहे. यंदाच्या दसरा मेळाव्यात शिवतीर्थावर उद्धव ठाकरे यांच्यासोबत मनसेप्रमुख राज ठाकरे हेदेखील दिसू शकतात. ठाकरे गटाचे नेते आणि विधानपरिषदेचे आमदार सचिन अहिर यांनी शनिवारी 'एबीपी माझा'शी बोलताना यासंदर्भातील संकेत दिले. दसऱ्याला तुम्हाला चांगली बातमी मिळेल. कदाचित राज ठाकरे यांना आमच्या पक्षाकडून दसरा मेळाव्याचे निमंत्रण दिले जाऊ शकते, असे सचिन अहिर यांनी म्हटले. सचिन अहिर हे शनिवारी 'एबीपी माझा'च्या न्यूजरुममधील गणपतीचे दर्शन घेतले. (पान २ वर)

# आता फक्त ५ आणि १८ टक्के जीएसटी

## पान मसाला, तंबाखू यांसारख्या सिन गुड्स आणि लक्झरी गाड्यांवर ४०% चा नवीन स्लॅब प्रस्तावित

**नवी दिल्ली :** देशातील नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून जीएसटी स्लॅबमध्ये मोठा बदल केला आहे. देशातील १२ टक्के आणि २८ टक्यांचा स्लॅब रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच जीएसटीचे स्लॅब असणार आहेत. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह परंही स्वस्त होणार आहेत. येत्या २२ सप्टेंबरपासून हा निर्णय लागू होणार आहे.




केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी स्वतः पत्रकार परिषद घेऊन या निर्णयांची घोषणा केली. तज्ज्ञांच्या मते. जीएसटीमधील या मोठ्या बदलांमुळे कररचना अधिक सोपी होईल आणि सामान्य नागरिकांवरचा आर्थिक भार कमी होईल.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटी स्लॅबमध्ये बदल झाल्याची माहिती दिली. या निर्णयामुळे देशातील शेतकरी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना फायदा होणार असल्याचं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे हा निर्णय शक्य झाल्याचं सांगत त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले. दिल्लीतील सुषमा स्वराज भवन येथे बुधवारी झालेल्या जीएसटी काउन्सिलच्या मॅरेथॉन बैठकीत कर प्रणालीत मोठा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. तब्बल १० तासांपेक्षा जास्त चाललेल्या या बैठकीत १२ टक्के आणि २८ टक्केचे स्लॅब पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. नव्या नियमानुसार आता ५ टक्के आणि १८ टक्के असे फक्त दोनच स्लॅब राहणार आहेत. केंद्र सरकारच्या या महत्त्वाच्या निर्णयामुळे व्यापारी तसेच सामान्य नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

**सुलभ कररचना**

* १२% आणि २८% स्लॅब रद्द.
* १२% मधील ९९% वस्तू आता ५% मध्ये.
* २८% मधील बहुतांश वस्तू १८% मध्ये.
* ऑटोमॅटिक रिफंड सिस्टीम लागू होणार.
* रजिस्ट्रेशन कालावधी १ महिना वरून फक्त ३ दिवसांवर आणला. त्याचा फायदा निर्यातकांना होणार आहे.

**कराचे दोन स्लॅब रद्द, घरे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कपडे, चपला स्वस्त होणार**

**कपडे व पादत्राणे**

२,५०० रुपयांपर्यंतच्या वस्तूंवर जीएसटी आता फक्त ५ टक्के लावण्यात येणार असल्याने कपडे आणि पादत्राणे अशा वस्तू स्वस्त होणार आहेत.

**दैनंदिन वस्तूंवर सवलत**

पनीर, खाखरा, चपाती, साबण, टूथपेस्ट, शॅम्पू यांसारख्या वस्तूंवरील कर १८% वरून ५% किंवा ०% करण्याबाबत चर्चा सुरू आहे.

**आरोग्य विमा व जीवन विमा**

५ लाख रुपयांपर्यंतच्या हेल्थ पॉलिसी व टर्म इन्शुरन्सवर पूर्ण सूट मिळण्याची शक्यता.

# मराठा समाजाला न्याय मिळवून देण्याचा आत्मविश्वास होता : विखे

## शिर्डी विमानतळावर स्वागत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सहकारी मंत्र्यांचे मोठे पाठबळ

**प्रवरानगर :** श्री साईबाबांच्या भूमीतून श्रध्दा आणि सबुरीचा संदेश घेऊनच आपण आझाद मैदानातील आंदोलनाला सामोरे गेलो होतो. दडपण होते, पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सहकारी मंत्र्याच्या पाठबळामुळे मराठा समाजाला न्याय मिळवून देण्याचा आत्मविश्वास मनात निश्चित होता, आशी भावना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बोलून दाखवली.

मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उपसमितीचे अध्यक्ष या नात्याने महत्वपूर्ण भूमिका बजावणारे मंत्री विखे पाटील यांचे शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाल्यानंतर, सकल मराठा समाजाच्य वतीने त्यांचे स्वागत करून अभिनंदन करण्यात आले. आ. विठ्ठलराव लंघे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, माजी नगराध्यक्ष अभय शेळके, संभाजी ब्रिगडचे दशरथ गव्हाणे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची तीव्रता जशी वाढत होती तेव्हाच उपसमीतीने बैठका घेऊन जरांगे पाटलांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय होण्याच्या दृष्टीने यशस्वी प्रयत्न केले. न्यायमूर्ती शिंदे समितीला विश्वासात घेऊन राज्याच्या महाधिवक्त्यांच्या मार्गदर्शनाने तयार केलेला मसूदा आंदोलकांच्या हाती ठेवला. यामधून आंदोलकांचे समाधान होईल असा आत्मविश्वास मनामध्ये होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टाकलेला विश्वास यामुळे सार्थ करता आला. झालेल्या निर्णयामुळे मराठा समाजातील बांधवाचे स्वप्न पूर्ण करता आल्याचा आनंद खूप मोठा आहे. झालेल्या निर्णयाचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संघर्ष योध्दा जरांगे पाटील यांनाच असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. आंदोलकांशी चर्चा करायला जाताना दडपण जरूर होते. एकीकडे आंदोलनाची न्यायालयात सुनावणी सुरू तर दुसरीकडे आंदोलनकर्त्यासमोर जाताना आमच्याप्रती त्यांच्या मनामध्ये असलेल्या विश्वासला कुठेही तडा जाणार नाही ही भूमिका होती. चांगले काम करून मराठा बांधवाना न्याय देण्याची भूमिका यासर्व निर्णय प्रक्रीयेमागे असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. मंत्री छगन भुजबळ यांच्या नाराजीवर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जेष्ठ नेते म्हणून त्यांनी यासर्व सामाजिक परिवर्तनात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सामाजिक दृष्टीकोनातून झालेल्या निर्णयाचा विचार करतील, आशी अपेक्षा व्यक्त करून मराठा समाजाप्रमाणेच ओबीसी समाजाच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी महायुती सरकारने उपसमिती नेमली आहे. राज्यात सदभावनेचे वातावरण असावे यासाठीच सर्व पक्षांचे प्रतिनिधीत्व यामध्ये असल्याचे त्यांनी सांगितले.



### हाके यांच्यावर टीका

राज्यात ओबीसी संघटनाकडून शासन निर्णयाच्या विरोधात सुरू असलेल्या आंदोलनावर प्रतिक्रीया व्यक्त करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, ओबीसी संघटनेचे नेते तायवडे यांनी घेतलेल्या भूमिकेचे आपण स्वागत करीत असून, मराठा समाजाबद्दल निर्णय करताना ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लगाणार नाही हेच त्यांनी झालेल्या निर्णयानंतर बोलून दाखवले आणि सरकारचीसुध्दा हीच भूमिका असतानाही काही लोक जाणीवपूर्वक वेगवेगळी वक्तव्य करून आपली राजकीय पोळी भाजून घेत असल्याची टीका त्यांनी हाके यांचे नाव न घेता केली.

### ...तर त्यात वावगे काय ?

शिवसेनेचे खासदार मिलींद देवरा यांनी आंदोलनाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्राबाबत बोलताना विखे यांनी सांगितले की, मुंबईकरांच्या झालेल्या गैरसोयीबद्दल मुख्यमंत्र्यांनीच दिलगीरी व्यक्त केली आहे. आंदोलनात मुंबई महापालिका, पोलीस प्रशासनाचे चांगले सहकार्य मिळाले. मराठा समाजाच्या काही भावना होत्या. त्यासाठी रस्त्यावर यायचे नाही तर कुठे यायचे, मराठी माणसामुळे मुंबई ठप्प झाली तर त्यात वावगे काय, असा प्रश्न मंत्री विखे पाटील यांनी केला.

### मराठा नेत्यांना आवाहन

झालेल्या निर्णयाबद्दल सरकारची केव्हाही चर्चा करण्याची तयारी आहे. मराठा समाजातील काही नेत्यांनाही या व्यासपीठावर येऊन आंदोलनात आपली भूमिका मांडण्याची संधी होती. केवळ बंद खोलीतून भूमिका व्यक्त करून दिशाभूल न करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी मराठा समाजातील नेत्यांना केले.

# अनुकंपाच्या १० हजार जागा भरणार; राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या अनुकंपा तत्वावरील नोकरीच्या संदर्भात अतिशय महत्वाची बातमी समोर आली आहे. अनुकंपा तत्त्वावरील रखडलेल्या जागा भरण्याचा राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. अनुकंपा तत्वावरील चतुर्थ श्रेणीतीलही जागा भरल्या जाणार आहे ज्यामध्ये राज्यभरा तील जवळपास ९ हजार ६५८ जागा आहेत.

या सर्व जागा १५ सप्टेंबरपर्यंत भरल्या जाणार आहेत. ज्यामुळे राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अनुकंपा तत्वावरी एवढी मोठी भरती होताना पाहायला मिळते आहे. चतुर्थ श्रेणीतील भरती ही खाजगी कंत्राटदराकडून केली जाते. मात्र अनुकंपावरील जेवढ्या जागा आहेत त्या भरल्या जाणार असल्याचा निर्णय आता राज्य सरकारने घेतला आहे. परिणामी प्रतीक्षेत असलेल्या सुमारे १० हजार उमेदवारांचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज्य सरकारने अनुकंपा तत्वावरील सर्व रिक्त पदे भरण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासोबतच या नियुक्ती प्रक्रियेत अनेक सुधारणा करून मृत शासकीय कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. ही प्रक्रिया येत्या १५ सप्टेंबर २०२५ पासून जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली राबवली जाणार आहे. राज्यातील शासकीय आणि निमशासकीय संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबातील पात्र वारसाला त्या विभागात नोकरी देण्याची तरतूद अनुकंपा धोरणात आहे. हे धोरण १९७३ पासून लागू आहे आणि त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. या धोरणानुसार गट–क आणि गट–ड मधील पदांसाठी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना ही सवलत मिळते. अशातच राज्यात अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या बऱ्याच काळापासून रखडल्या होत्या. यामध्ये महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांमधील एकूण ९,५६८ उमेदवार प्रतीक्षेत आहेत. यापैकी सर्वाधिक ५,२२८ उमेदवार हे महानगर पालिकांमधील, ३,७०५ जिल्हा परिषदांमधील, तर ७२५ उमेदवार नगर पालिकांमधील आहेत. नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक ५०६ उमेदवार प्रतीक्षेत असून, त्यानंतर पुणे (३४८), गडचिरोली (३२२) आणि नागपूर (३२०) यांचा क्रमांक लागतो. त्यामुळे या शासन निर्णयाचा संबंधितांना फायदा होणार आहे. मराठा समाजासाठी हैदराबाद गॅझेटचा आधार घेऊन प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी जीआर लागू करण्यात आलाय. हैदराबाद गॅझेट केवळ औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड आणि धाराशिव, हिंगोली, जालना या जिल्ह्यांचा समावेश आहे. महसूल आयुक्त पुणे यांनी मात्र सदर दाखले देण्यासाठी सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा आणि सांगली जिल्ह्याला देखील सूचना केल्याने आश्चर्य व्यक्त केल जात आहे.

# ट्रम्प सरकार आणखी एक कठोर पाऊल उचलणार

**वॉशिंग्टन डीसी:** भारतावर ५० टक्के टॅरिफ लादल्यावर अमेरिकेतील ट्रम्प सरकार आणखी एक कठोर पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. अमेरिकन आयटी कंपन्यांकडून भारतीय कंपन्यांना आऊटसोर्स केलं जाणार काम थांबवण्याचा विचार ट्रम्प प्रशासनाकडून सुरु आहे. ट्रम्प यांच्या जवळच्या समर्थक लॉरा लूमर यांनी हा दावा केला आहे. त्यांनी या संदर्भात सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे.

आता तुम्हाला इंग्रजीसाठी २ दाबण्याची गरज नाही. कॉल सेंटर पुन्हा एकदा अमेरिकी व्हावेत,' असं लूमर यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. ट्रम्प आता अमेरिका फर्स्ट अजेंड्यावर काम करत आहेत. आता त्यांच्या निशाण्यावर भारतातील आयटी कंपन्या आहेत.

# रोपवे तुटल्यानं ६ जणांचा मृत्यू

**गांधीनगर:** गुजरातमधील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या पावागढमध्ये भीषण दुर्घटना घडली आहे. बांधकाम साहित्य घेऊन जाणारा रोपवे तुटल्यानं झालेल्या भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात दोन लिफ्ट ऑपरेटर, दोन मजूर आणि अन्य दोन जणांचा समावेश आहे. या दुर्घटनेनंतर पावागढमध्ये खळबळ उडाली आहे. पंचमहालच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अपघाताच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तार तुटल्यानं दुपारी साडे तीनच्या सुमारास हा अपघात झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस आणि अग्निशमन दलाचं पथक दुर्घटनास्थळी पोहोचलं. त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरु केलं. या अपघातानंतर परिसरात घबराट पसरली आहे. सध्याच्या घडीला प्रशासनाचं पथक घटनास्थळी उपस्थित आहे. अपघातांच्या कारणांचा आढावा घेतला जात आहे. मांचाहून निज मंदिरापर्यंत बांधकाम साहित्य पोहोचवण्यासाठी रोपवे चालवण्यात येतो. शनिवारी दुपारच्या सुमारास त्याची तार तुटली आणि त्यातील सगळे जण अचानक खाली पडले. अवघ्या काही क्षणांमध्ये हा सगळा प्रकार घडला. त्यामुळे कोणालाच काही करता आलं नाही.

# १२ हजार कोटी रुपयांची एमडी ड्रग्ज फॅक्टरी उद्ध्वस्त

**मुंबई :** मीरा–भाईंदर पोलिसांनी केलेल्या मोठ्या कारवाईत तब्बल १२ हजार कोटी रुपयांची एमडी ड्रग्ज फॅक्टरी उद्ध्वस्त करण्यात आली आहे. तेलंगणातील चेरापल्ली येथे चालवल्या जात असलेल्या या गुप्त फॅक्टरीवर छापा टाकून ३२ हजार लिटर कच्चे ड्रग्ज (रॉ मटेरियल) जप्त करण्यात आले. या कारवाईत एकूण १२ जणांना अटक करण्यात आली असून त्यामध्ये फॅक्टरीचा मालक, एक केमिकल ॲनालायझर तसेच एक विदेशी नागरिकाचाही समावेश असल्याची माहिती मिरा भाईंदरचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांनी दिली आहे. या कारवाईची सुरुवात केवळ २०० ग्रॅम ड्रग्ज पकडल्यानंतर झाली होती. त्यावरून सुरू झालेल्या तपासाचा धागा पकडत पोलिसांनी चौकशीचा विस्तार केला आणि अखेर २५ लाखांच्या मालापासून तब्बल १२ हजार कोटींपर्यंतच्या अमली पदार्थांच्या जाळ्याचा पर्दाफाश केला.

पोलिसांच्या तपासात या ड्रग्ज फॅक्टरीतून महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असल्याचे उघड झाले आहे. जप्त केलेले ड्रग्ज अत्यंत उच्च दर्जाचे असून याचा वापर आंतरराज्य पातळीवरील तस्करीसाठी केला जात होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या फॅक्टरीचा मालक हा बीएसई इंजिनियर आहे. त्याने रासायनिक प्रक्रियेतील तज्ज्ञांच्या मदतीने फॅक्टरी उभारली होती. त्याच्यासोबत केमिकल ॲनालायझर आणि परदेशी नागरिकालाही अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्रासह देशभरात खळबळ उडाली आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर पकडले गेलेले ड्रग्ज हे आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या कारवायांपैकी एक ठरत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

मिरा भाईंदरचे पोलीस आयुक्त निकेत कौशिक म्हणाले की, क्राइम ब्रांच युनिट फोरच्या टीमने एक महिन्यापूर्वी पेडलर्सला अटक केले होते. यानंतर तपासाला सुरुवात झाली आणि आम्ही तेलंगणातील कारखान्यापर्यंत पोहोचलो.

पान १ वरून

### गणपती बाप्पाला निरोप द्यायला वरुणराजाची हजेरी

अर्थात मुंबईचा राजा म्हणून ओळखला जाणारा गणपती सर्वात आधी विसर्जनासाठी लागेल. त्यानंतर लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, अंधेरीचा राजा आणि लालबाग व परळ परिसरातील मानाचे इतर गणपती विसर्जनासाठी मंडपातून निघतील. लालबागचा राजाची विसर्जन मिरवणूक ही सर्वाधिक आकर्षणाचा विषय असेल. लालबागचा राजा आज दिवसभर आणि रात्रभर फिरुन रविवारी सकाळी गिरगाव चौपाटीवर विसर्जनासाठी दाखल होईल.

### शिक्षणातील त्रिभाषा धोरण ठरवणार समिती

अभ्यास समिती नेमली. ही समिती तीन महिन्यांत आपला अहवाल सादर करणार होती. या गोष्टीला अडीच महिने उलटून गेल्यावर आता राज्य सरकारने या समितीतील अन्य सदस्यांची नेमणूक करण्याबाबतचा निर्णय जाहीर केला. या सदस्यांमध्ये भाषा सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचे संचालक डॉ. वामन केंद्रे, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अपर्णा मॉरिस, डेक्कन कॉलेजच्या भाषा विज्ञानप्रमुख सोनाली कुलकर्णी–जोशी, शिक्षणतज्ज्ञ डॉ. मधुश्री सावजी, बालमानसतज्ज्ञ डॉ. भूषण शुक्ल आणि समग्र शिक्षा अभियानचे राज्य प्रकल्प संचालक संजय यादव यांचा समावेश आहे.

सरकारच्या या निर्णयावर आता विविध संस्था झोड उठवत आहेत. सरकारने हिंदी भाषा आणि तिसऱ्या भाषेसंबंधी दोन्ही शासन निर्णय रद्द केले, तेव्हाच महाराष्ट्राची मागणी पूर्ण झाली होती. सरकारने तिथेच थांबणे अपेक्षित होते. त्यामुळे ही समितीच सरकारने रद्द करावी, अशी मागणीही झाली होती. तिसरी भाषा नको, या मताची दखलच न घेण्याचे सरकारने ठरवले आहे, अशी प्रतिक्रिया मराठीच्या व्यापक हितासाठीचे प्रमुख संयोजक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी दिली.

शालेय शिक्षण अभ्यास व कृती समन्वय समितीचे निमंत्रक दीपक पवार यांनीही या समितीलाच कडाडून विरोध केला. मुळात तीन महिन्यांत अहवाल सादर करणे अपेक्षित असताना समिती सदस्य अडीच महिन्यांनी नेमले गेले. आता १५ दिवसांत हे सदस्य काय अभ्यास करणार आहेत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्र्यांना येनकेन प्रकारेण तिसऱ्या भाषेची सक्ती करायचीच आहे, हा या समितीचा अर्थ आहे. पण आमचा तिसऱ्या भाषेच्या सक्तीला विरोध होता आणि आजही आहे. त्यासाठी पुन्हा एकदा संघर्ष करावा लागला, तरी आमची तयारी आहे, असे पवार यांनी नमूद केले.

### ज्यांच्याकडे पुरावा तेच कुणबी

त्यांच्या मनात शंका नाही. मला वाटतं की आम्ही छगन भुजबळ यांच्या मनातील शंका देखील दूर करू. इतर कोणाच्या मनात शंका असेल तर ती देखील आम्ही दूर करू, देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी एक गोष्ट स्पाट करू इच्छितो की आमचं सरकार आहे तोवर ओबीसींवर अन्याय होणार नाही. एका समाजाचं आरक्षण काढून दुसऱ्या समाजाला देण्याचा आमचा विचार नाही. मराठ्यांच्या हक्काचं मराठ्यांना, ओचीसीच्या हकाचं ओबीसींना मिळेल. दोन समाजांना एकमेकासमोर आणण्याचा प्रकार इथे घडणार नाही.

### पंतप्रधान मोदींशी माझी मैत्री कायम राहिल : ट्रम्प

आणि अमेरिका खूप सकारात्मक आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी टुथ या सोशल मीडियावर चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक फोटो शेअर केला होता. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी म्हटले होते की, ''असे दिसते की आपण भारत आणि रशियाला चीनमुळे गमावले आहे. त्यांचे भविष्य दीर्घ आणि समृद्ध असो!''

### दसरा मेळाव्यात राज–उध्दव एकत्र दिसणार

यावेळी त्यांनी दिलेल्या छोटेखानी मुलाखतीत ठाकरे बंधूंच्या राजकीय मिलनाविषयी महत्त्वाची टिप्पणी केली.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येणे, ही केवळ दोन पक्षांची गरज नसून ते राज्यासाठी गरजेचे आहे. ही लोकांच्या मनातील भावना आहे. आता गणपती संपल्यानंतर पितृपक्ष सुरु होत आहे. त्यामुळे आता दसऱ्याला चांगली बातमी मिळेल, अशी अपेक्षा आहे. दसरा मेळाव्यात आमचे नेते सध्याची परिस्थिती काय आहे आणि त्याला सामोरे कसे जायचे, याविषयी मार्गदर्शन करतील. दसरा मेळाव्यातून कार्यकर्त्यांना दिशा द्यायची असते. त्यामुळे हा मेळावा राजकीय आणि सामाजिक दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे, असे सचिन अहिर यांनी म्हटले. राज आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही भाऊ हे एकमेकांना कायम बघत असतात. दसरा मेळाव्याला हे दोघे स्टेजवर एकत्र येतील, का माहिती नाही. पण आम्ही त्यांना आमंत्रित करु शकतो, ही शक्यता नाकारता येत नाही. आमच्याप्रमाणे त्यांचाही मेळावा असतो. त्यामुळे तेदेखील आम्हाला आमंत्रित करु शकतात, असे सचिन अहिर यांनी म्हटले. पक्षाचं आणि आघाडीचं व्यासपीठ वेगळं असतं. परंतु, यावेळचा शिवतीर्थवरील दसरा मेळावा हा 'न भूतो न भविष्यती', स्वरुपाचा असेल, असे संकेत सचिन अहिर यांनी दिले.

मुंबईत मराठी माणसाचं अस्तित्वं टिकवण्यासाठी दोन्ही भावांनी एकत्र येणं गरजेचं: सचिन अहिर

गेल्या काही वर्षांपासून मुंबईची भौगोलिक परिस्थिती बदलत चालली आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची यंदाची निवडणूक ही मराठी माणसासाठी अस्तित्त्वाची लढाई असेल. मी १५ वर्षे काँग्रेस–राष्ट्रवादीसोबत होतो. पण तेव्हा आम्हाला कधीही शिवसेनेसारखा पक्ष नसावा, असे वाटले नाही. राज्यात आपण नेतृत्व करतोय. पण महानगरपालिका शिवसेनाच चांगली चालवू शकते, हे आम्हाला वाटत होते. मुंबईचे स्वरुप आता बदलत चालले आगे. त्यामुळे मुंबईत आता मराठी माणूस टिकवायचा असेल तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांनी एकत्र येऊन नेतृत्त्व करणे, ही काळाजी गरज आहे, असे मत सचिन अहिर यांनी व्यक्त केले.

| | | |
|---|---|---|
| चिमण्या चिवचिवल्या | - मा.रा.लामखडे | रु. १०० |
| टिकली तर टिकली | - श्रद्धा बेलसरे | रु. १५० |
| रानसय | - भास्कर चंदनशीव | रु. २२५ |
| निःशब्द कोलाहल | - धनंजय गोवर्धने | रु. ११० |
| आधुनिक मराठी गेय कविता | - डॉ.सयाजीराजे मोकाशी | रु. १७५ |
| मुके जाते गाणे गाते | - विनायक बंगाळ | रु. ९० |
| कानडी मुलखातील मुशाफिरी (प्रवास वर्णन) | - मा.रा.लामखडे | रु. २२० |
| पैंजणांचे झाड | - सिसिलिया कार्व्हालो | रु. १५० |
| काळोखाला दूर सारून | - प्रतिभा जाधव | रु. १४० |
| साळुंकीची सावली | - महावीर जोंधळे | रु. १८० |
| उत्कर्षवाटा (पुणे विद्यापीठ) | - संपा.डॉ.लांडगे, डॉ.रोंगटे, डॉ.सांगळे | रु. १२० |
| रंग जीवनाचे | - बबन काकडे | रु. २५० |
| च्यामारी | - डॉ.प्रमोद काळे | रु. १८० |
| कुब्र | - सत्यजित पाटील | रु. २३० |

**नाटक/एकांकिका/चित्रपट विषयक**

| | | |
|---|---|---|
| तुंबारा | - सयाजी शिंदे | रु. २५० |
| तृतीय रत्न (नाटक) (जळगाव विद्या. अभ्यासक्रमात समाविष्ट) | - ले.जोतिराव फुले, संपा. दत्ता भगत | रु. २२५ |
| माझं घर | - जयंत पवार | रु. १६० |
| जनक | - शार्दुल सराफ | रु. १५० |
| हंडाभर चांदण्या (संहिता आणि लेख) (पुणे विद्यापीठ) | - दत्ता पाटील/ संपा.सतिश बडवे | रु. १५० |
| राहिले दूर घर माझे | - शफाअत खान | रु. १४० |
| चौक | - मकरंद साठे | रु. १२० |
| मंथरक आणि इतर एकांकिका | - जयसिंग पाटील | रु. ९० |
| जाता नाही जात | - सिद्धार्थ तांबे | रु. १५० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| प्रत्ययकारी परदेशी सिनेमा | - उदय कुलकर्णी | रु. ६५० |

**चरित्र/आत्मचरित्र**

| | | |
|---|---|---|
| श्री.संत चोखामेळा : चरित्र आणि अभंग | - संपा.स.भा.कदम, प्रस्ता.भालचंद्र नेमाडे | रु. १६० |
| जिजी (शेतकरी आईची जीवनगाथा) | - प्रा.सौ.लिला जंजिरे | रु. २०० |
| कोकरूड ते बर्मिंगहॅम | - प्रा.अब्दुलगनी अत्तार | रु. ३७५ |
| सुंबरान | - दिनकर यमनाजी शेलार | रु. २५० |
| पंख गळून गेले तरी | - सुधीर देवरे | रु. ८० |
| स्त्रीरत्न क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चोले | रु. ७५ |
| मलिक अंबर | - वि.स.वाकसकर | रु. १०० |
| लावणी सम्राज्ञी (यमुनाबाई वाईकर यांचे चरित्र) | - प्रभाकर ओव्हाळ | रु. २५० |
| कांताबाई सातारकर | - संतोष खेडलेकर | रु. २०० |
| स्वातंत्र्यसूर्य महाराणा प्रताप | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| संत मीराबाई | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २०० |
| मी तो हमाल | - आप्पा कोरपे | रु. १५० |
| प्रकाशाची बेटे | - अभिमन्यू सूर्यवंशी | रु. २२० |

**कविता संग्रह**

| | | |
|---|---|---|
| बालकवींच्या निवडक कविता | - संपा.ना.धों.महानार | रु. ११५ |
| वसा | - वसंत सावंत | रु. ७५ |
| सुमती लांडे : समग्र कविता | - संपादक : कविता मुरुमकर/ सुमती लांडे | रु. ५९९ |
| कमळकाचा | - सुमती लांडे, चित्रप्रत्यय-प्रभाकर कोलते | रु. २०० |
| वाहते अंतर | - सुमती लांडे | रु. ९० |
| तुकाराम : अहिराणीत निरुपण | - डॉ.एस.के.पाटील | रु. ५२५ |
| बोलावे ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त) | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| येरू म्हणे | - प्रवीण बांदेकर | रु. १०० |
| बोलावे ते आम्ही | - श्रीकांत देशमुख | रु. ३८० |
| ऋतुपर्णाच्या कविता | - जितेंद्र कुंवर | रु. ३०० |
| आवानओल | - अजय कांडर | रु. १०० |
| प्रलयानंतरची तळटीप | - सुचिता खल्लाळ | रु. २२५ |
| दंडविधान | - मनोज सुरेंद्र पाठक | रु. २७० |
| एक शून्य प्रतिक्रिया | - व्यंकटेश चौधरी | रु. २०० |
| माणूस उकरून काढावा लागतोय | - सिसिलिया कार्व्हालो | रु. २०० |
| ज्याचा त्याचा चांदवा | - अंजली ढमाळ | रु. २२० |
| दुभंगवाणी | - डॉ.नंदू मुलमुले | रु. १५० |
| गरम झळा आणि संभ्रमाची फळे | - पोपट सातपुते | रु. १०० |
| भुईशास्त्र (साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त) | - ऐश्वर्य पाटेकर | रु. २२० |
| भुई तापाचे बळी | - प्रभाकर महाजन | रु. १६० |
| हिन्दोल | - संध्या शहापुरे | रु. २५० |
| अस्वस्थ क्षणांचे पाश | - समाधान महाजन | रु. १२० |
| विसविशीत जगण्याच्या उंबरठ्यावरून | - विलास माळी | रु. २०० |
| तहानलेले पाणी | - मारुती सावंत | रु. १२० |
| पाच बिघे | - लक्ष्मण बारहाते | रु. ८० |
| रक्तसेतू | - सुखदेव ढाणके | रु. १०० |
| हुर्दुक | - सुखदेव ढाणके | रु. ९० |
| ओले अथांग श्वास | - रामकली पावसकर | रु. १०० |
| स्त्री कुसाच्या कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १२५ |
| कुणब्याची कविता | - लक्ष्मण महाडीक | रु. १३० |
| बळीचं जिणं | - दयाराम गिलाणकर | रु. १०० |
| कविता दिक्षेच्या | - महेंद्र भास्कर पाटील | रु. ८० |
| मेघवृष्टी | - जयराम खेडेकर | रु. १०० |
| विलग | - गणेश आत्माराम वसईकर | रु. ९० |
| वादळवाट | - वंदना महाजन | रु. १५० |
| जिवन नरहची आसामी कविता | - अनु.शोभा नाईक | रु. ७५ |
| ब्रम्हसोपान | - रेषा आकोटकर | रु. ९० |
| एक टुकडा आसमाँ का | - विश्वजीत तुळजापूकर | रु. ७५ |
| एका गोरज घडीला (O.P) | - अरुण सांगोळे | रु. ७५ |
| नांगरून पडलेलं शतक | - रमेश चिल्ले | रु. ८० |
| अनुकार | - जयश्री पाठक | रु. ९० |
| खानदानी | भगवान देशमुख | रु. ८० |
| जगण्याच्या कोलाहलात | - गणेश मरकड | रु. २०० |
| आयडियल स्टेटच्या हद्दीबाहेरून | - सिद्धार्थ तांबे | रु. ७० |
| ओळींनी अंबर व्हावे | - रमेश मगरे | रु. ११० |
| निरिच्छ नभ | - विनायक त्र्यं.पाटील | रु. ७० |
| रूप-अरूपाचे | - अशोक सोनवणे | रु. १०० |
| भोग सरू दे उन्हाचा | - कैलास दौंड | रु. ९० |
| इंद्रधनूच्या कमानीवर | - राजेश जाधव | रु. १०० |
| अक्षरऋतू | - प्रमोद जोशी | रु. १०० |
| रानभरारी | - गुंफा कोकाटे | रु. ८० |
| पाऊल खुणा | - संजीव दुधाट | रु. ८० |
| बाणगंगेच्या तिरी | - डॉ.मधुकर कवडे | रु. ९० |
| जन्मांतर | - शुभम अनिल दुरगुडे | रु. १२० |
| निवडक कविता | - संपा.प्रा.डॉ.वसंत शेकडे | रु. १०० |
| फिर्याद | - हिरा बनसोडे | रु. १०० |
| दाहगाथा | - कैलास सलादे | रु. १२० |
| अकुतोभय | - निलेश शेळके | रु. १४० |
| संदर्भासहित स्पष्टीकरण | - इरावती इंगवले-यादव | रु. १२० |
| सूर्य गेला नाही अजून अस्ताला | - विनायक हिरवे | रु. १५० |
| जखमी पावलांचे ठसे | - कैलास जिजाबाई चावडे | रु. १२० |
| केकतीची फुले | - ल.सि.जाधव | रु. १०० |
| काव्यबंध (मुंबई विद्यापीठ) | - संपा.डॉ.नीलकंठ शेरे/डॉ. नानासाहेब यादव/ डॉ.जगदिश राणे | रु. २०० |
| मी मातीचे फूल | - मीनल येवले | रु. २०० |
| ऐन पस्तिशीत | - दिलीप वीरखेडे | रु. ८० |
| काव्यभान | - रविंद्र कांबळे | रु. १०० |
| धुनी (O.P) | - सुरेश सावंत | रु. २०० |
| काहीच नष्ट होत नसतं | - विजय चोरमारे | रु. १६० |
| गाव हाकेच्या अंतरावर (O.P) | - जगदीश कदम | रु. १२० |
| माणूसनामा | - कैलास पगारे | रु. १२० |
| साकल्याच्या प्रदेशात | - डॉ.सिसिलिया कार्व्हालो, डॉ.धनाजी गुरव, डॉ.निलकंठ शेरे | रु. १५० |
| अधांतर अंधारात | - महेश केळुसकर | रु. २२० |
| आत्मपीठ | - मंदाकिनी पाटील | रु. २६० |
| पद्म गोपाळ | - सौ.निर्मला काळे | रु. ३०० |
| काव्यरंग | - डॉ.आरेकर, डॉ.यादव, डॉ.राणे | रु. २२० |
| हंबरवाटा | - संतोष आळंजकर | रु. २५० |
| दंडविधान | - मनोज पाठक | रु. २७० |
| कथार्सिस | - सारिका उबाळे | रु. ३४० |

**चरित्र**

| | | |
|---|---|---|
| संत गाडगेबाबा | - विजय पाटील | रु. ३० |
| बहिणाबाई चौधरी | - मृण्मयी पाटील | रु. ३० |
| अहिल्याबाई होळकर | - विजया पाटील | रु. ३० |
| स्त्रीरत्न सावित्रीबाई फुले | - रावसाहेब चौले | रु. ७५ |
| अहिल्याबाई होळकर | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| बहिणाबाई चौधरी : चरित्र आणि निवडक कविता | - सुमती पाटील | रु. ५० |
| डॉ.अब्दुल कलाम : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| इंदिरा गांधी : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| पंडित जवाहरलाल नेहरु : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| महात्मा ज्योतिबा फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| राष्ट्रपिता महात्मा गांधी | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| सावित्रीबाई फुले : चरित्र आणि कार्य (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| सम्राट अशोक : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. ५० |
| शाहू महाराज : चरित्र आणि कार्य | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| जे.आर.डी.टाटा | - मृण्मयी पाटील | रु. ५० |
| यशस्वी भारतीय महिला (O.P) | - सुमती पाटील | रु. ५० |
| झाशीची राणी : चरित्र आणि कार्य | - सुमती पाटील | रु. १०० |
| पंडित दीनदयाळ उपाध्याय | - सुमती पाटील | रु. ५० |

**सामान्यज्ञान**

| | | |
|---|---|---|
| आधुनिक बेकरी व्यवसाय तंत्रज्ञान | - यू.डी.चव्हाण | रु. १००० |

**शैक्षणिक/बाल/कुमार/प्रौढ साक्षर/इत्यादी**

| | | |
|---|---|---|
| निसर्गाकडे चला | - डॉ.गजानन पाटील | रु. १४० |
| तंत्र तणावमुक्तीचे | - डॉ.गजानन पाटील | रु. ४० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग १ | - डॉ.गजानन पाटील | रु. ६० |
| तंत्र व्यक्तिमत्व विकासाचे भाग २ | - डॉ.गजानन पाटील | रु. १२५ |
| मानसिक तणावमुक्त अध्यापन प्रतिमान (O.P) | - डॉ.गजानन पाटील | रु. १०० |
| पर्यावरण प्रकल्प कार्य (O.P) | - डॉ.तरुजा भोसले | रु. २५० |
| शालेय ग्रंथालय व्यवस्थापन | - डॉ.सी.श्री.पाटील | रु. १५० |
| शब्दसंपदा : निवडक भाषणे | - डॉ.भगवान सावंत | रु. ८० |
| सप्तरंगी एकांकिका | - दयाराम गिलाणकर | रु. १२० |
| आठवणी यदुनाथांच्या | - संपा.डॉ.प.शं.झेंडे | रु. ७० |
| योगासनांची ओळख | - डॉ.प.शं.झेंडे | रु. ४५ |
| अध्यात्म, विज्ञान व संस्कार मूल्य | - दत्तात्रय चिताळकर | रु. १०० |
| गीतइसापनीती | - उषा परब | रु. ८० |
| करामती प्रकाश | - विजय नांगरे | रु. ५० |
| ओंजळीतील मोती | - प्रमिला हनुमंतराव रासकर | रु. १२० |
| एड्स | - विजया पाटील | रु. १५ |
| चिकुनगुणिया | - डॉ.एस.के.पाटील | रु. १५ |
| नखे कापा - निरोगी राहा | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. ३५ |
| खानदेशी गाव | - आबा महाजन | रु. १८० |
| नखपुराण | - डॉ.राजेंद्र मलोसे | रु. १५ |
| परोपकारी शंकर | - विजय नांगरे | रु. १५ |
| बहुगुणी तुळस | - डॉ.मंगला काजळे | रु. १५ |
| आपला नांदेड जिल्हा | - सुमती पाटील | रु. ३० |
| मालगुंडचा सिद्धू | - आनंद वाघ | रु. ३०० |
| बालसंस्कार | - ताई पवार | रु. १०० |
| आम्ही भी घडणार | - ताई पवार | रु. ११५ |
| विज्ञान कोडे | - ताई पवार | रु. १२० |
| दिशा नवोपक्रमाची | - ताई पवार | रु. १४० |
| श्री गणेशा शिक्षणाचा | - ताई पवार | रु. ९० |
| छत्रपती शिवाजी राजेभोसले यांचा पवाडा | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १०० |
| गुलामगिरी | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| शेतकऱ्याचा असूड | - महात्मा ज्योतीराव फुले | रु. १५० |
| योग - सर्वांसाठी | - आनंद वाघ | रु. २५० |
| योगा - खेळ, छंद आणि संस्कार | - आनंद वाघ | रु. २५० |
| कोवीड १९ - अकल्पीत चकवा | - आनंद वाघ | रु. २०० |
| स्त्री - पुरुष तुलना | - ताराबाई शिंदे - संपा.महेंद्र मुंजाळ | रु. १२५ |
| महाराष्ट्रातील समाजसुधारक | - अे. देशमुख | रु. ८० |

**कृषि विषयक पुस्तके**

**डॉ. यू. डी. चव्हाण / डॉ. पी. जी. पाटील**

| | |
|---|---|
| मधुमक्षिका पालन - आळींबी लागवड (शेतीतील जोडधंदे) | रु. ७२० |
| पेपेन उद्योग - रेशीम उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| कुक्कुट पालन-ससे पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| शेळी पालन - मेंढी पालन (शेतीतील जोडधंदे) | रु. ७१० |
| पशुपालन व दुग्धव्यवसाय - गांडुळ खत निर्मिती प्रकल्प | रु. ७०० |
| वराह पालन - मत्स्य उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ७०० |
| महिलांना करता येण्यासारखे उद्योग (शेतीतील जोडधंदे) | रु. ६९० |
| कृषि अवजारे व यंत्राचा उपयोग (शेतीतील जोडधंदे) | रु. २६० |
| मसाला प्रक्रिया उद्योग | रु. ५७० |
| मत्स्य प्रक्रिया उद्योग | रु. ७०० |
| आंबा-केळी-द्राक्ष प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| अननस-चिकू-पेरु प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| अंजिर-चिंच-जांभूळ-पपई-स्ट्रॉबेरी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| आवळा-डाळींब-बोर-प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| दूध व दुग्धजन्य पदार्थ | रु. ६५० |
| फळभाज्या प्रक्रिया उद्योग | रु. ६४० |
| काजू-कवठ-फालसा-कृष्णफळ-करवंद-सफरचंद-कोकम-फणस-उंबर-लिची प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| लिंबूवर्गीय फळे प्रक्रिया उद्योग | रु. ६३० |
| मांस-मटन-अंडी प्रक्रिया उद्योग | रु. ६५० |
| टोमॅटो-बटाटा-कांदा-लसून-प्रक्रिया उद्योग | रु. ६१० |
| तृणधान्य-कडधान्य-गळीतधान्य प्रक्रिया उद्योग | रु. ७१० |
| वाईन उद्योग | रु. ७५० |
| कृषि क्षेत्रातील कृषि उद्योग | रु. ५५० |
| कृषि प्रक्रिया उद्योग कोश | रु. २००० |
| अक्षय उर्जा | रु. १७० |

**शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर यांची महत्त्वाची पुस्तके मागविण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा – मो. ९०११२०१४१४ / ९८२२५२५४४४**


CMS
CREATIK
MULTI SERVICES PVT LTD



Vision India

Discover Pustakvari : The Ultimate eBook Platform
State-of-the-Art eBook Readers
Advanced Security and Technology
Intelligent Search and Realistic Viewing Experience
Expansive Content Library
Global Accessibility and Multi-Publisher Platform

Tailored Solutions for Institutes and Libraries
Interactive Learning with General Knowledge Software
Smart Recommendations and User Customization



Contact US
Email : creatikpvtltd44@gmail.com
Contact : +91 22 3599 9192 I +91 9822525444
Website : creatikmultiservices.com

Gut No. 125, Ranjankhol, Tal. Rahata, Dist. Ahmednagar 413709

# ओबीसींच्या १२ मागण्या मान्य

**नागपूर :** एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरु केले होते. तर दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात गेल्या सहा दिवसांपासून साखळी उपोषण सुरु करण्यात आले होते. आज मंत्री अतुल सावे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. ओबीसी समाजाच्या १४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्याची माहिती अतुल सावे यांनी दिल्यानंतर बबनराव तायवाडे यांनी अखेर उपोषण मागे घेतले.



अतुल सावे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाला गदा येणार नाही याची काळजी घेतली आहे. शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने जे नुकसान झाले त्यावर प्रक्रिया सुरु केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय आम्ही अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आपल्या एकूण १४ मागण्या मांडल्या आहेत. ओबीसी वसतिगृहासाठी नागपूरमध्ये दोन इमारती उपलब्ध करून दिल्या जाण्याचा निर्णय झाला आहे.

ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. १८ महामंडळ तयार केली आहेत. ५-५ कोटी रुपयांचा निधी दिलाय, आता ५०-५० कोटी निधी प्रत्येक महामंडळाला देणार आहोत. जिल्ह्याच्या ठिकाणी ओबीसींसाठी अभ्यासिका सुरु करु. महामंडळांना एक हजार कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी म्हटले. राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १२ मागण्या आज सरकारने मान्य केल्या आहेत. आता आपण आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती मंत्री अतुल सावे यांनी बबनराव तायवाडे यांना केली. यानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण थांबवल्याची घोषणा केली. दरम्यान, एक महिन्याच्या आत ओबीसींच्या सर्व मागण्यांचे शासन आदेश काढले जाईल, असे आश्वसन अतुल सावे यांनी दिले.

दरम्यान, बारा मागण्या मान्य करण्यात आल्या असून ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व महामंडळाच्या सर्व मंजूर योजना त्वरीत सुरु करण्यात याव्यात तसेच ओबीसी मुलांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागु करण्यात यावी, या दोन मागण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल असे सावे म्हणाले.

## मुंबईला बॉम्बने उडवण्याची धमकी

**मुंबई** : मुंबईत अनंत चतुर्दशीच्या दिवशी ४०० किलो आरडीएक्सने शहर उडवून देण्याची धमकी देणाऱ्या एका व्यक्तीला मुंबई पोलिसांनी नोएडामधून अटक केली आहे. यासोबतच, २४ तासांच्या आतच संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. आरोपीची ओळख अश्विनी कुमार सुप्रा अशी झाली असून, तो मूळचा बिहारचा रहिवासी आहे. तो गेल्या पाच वर्षांपासून नोएडामध्ये राहत होता. अश्विनी स्वतःला ज्योतिषी म्हणवत असे.

गुरुवारी दुपारी सुमारे २ वाजता मुंबई वाहतूक पोलिसांच्या अधिकृत व्हॉट्सअॅप नंबरवर धमकीचे संदेश आले होते. शहरात ३४ गाड्यांमध्ये ह्युमन बॉम्ब लावण्यात आले आहेत, असा दावा करण्यात आला होता.

## पंजाबमध्ये तीन दशकांमधील सर्वात मोठा पुर

**चंदीगढ** : पंजाब सध्या गेल्या तीन दशकांमधील सर्वात मोठ्या पुराचा सामना करत आहे. राज्यातील सर्व २३ जिल्हे पुराचा तडाखा सहन करत आहेत. मुसळधार पाऊस, नद्यांचा पूर आणि धरणांमधून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे पंजाबमधील प्रत्येक गाव उद्ध्वस्त झाले आहे.

या पुरामुळे पंजाबच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. आतापर्यंत सुमारे १.४८ ते १.७२ लाख हेक्टरवरील पिके नष्ट झाली आहेत. भात, कापूस आणि ऊस यासारखी प्रमुख पिके पूर्णपणे पाण्यात बुडाली आहेत. गुरुदासपूर हा सर्वात जास्त प्रभावित जिल्हा आहे, जिथे ४० हजार हेक्टरपेक्षा जास्त जमीन पाण्याखाली गेली आहे आणि ३०० हून अधिक गावे उद्ध्वस्त झाली आहेत. जमिनीत गाळ साचल्याने पुढील पेरणीही धोक्यात असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

या पुरामुळे आतापर्यंत ४३ लोकांचा बळी गेला आहे. हजारो कुटुंबे बेघर झाली आहेत आणि सुमारे २२ हजार लोकांना स्थलांतरित करण्यात आले आहे. राज्यभरात ७४ हून अधिक मदत शिबिरे उभारण्यात आली आहेत, जिथे लोकांना तात्पुरता आश्रय दिला जात आहे. सैन्य, हवाई दल, नौदल, बीएसएफ आणि एनडीआरएफच्या पथके बोटी आणि हेलिकॉप्टरच्या मदतीने मदत आणि बचाव कार्य करत आहेत.



मुख्यमंत्री भगवंत मान यांनी राज्यात नुकसानाचे मूल्यांकन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत आणि शेतकऱ्यांना भरपाई देण्याचे आश्वासन दिले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव शाळा आणि महाविद्यालये ७ सप्टेंबरपर्यंत बंद ठेवण्यात आली आहेत. केंद्राच्या वतीने केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अमृतसर, गुरुदासपूर आणि कपूरथळा येथे भेट दिली. त्यांनी पंतप्रधानांना पिकांच्या नुकसानीचा अहवाल सादर करण्याबाबत बोलले. केंद्राने पंजाबमध्ये दोन उच्चस्तरीय पथके पाठवली आहेत, जी धरणे आणि नदीचे बंधारे मजबूत करण्यासारखी पावले सुचवतील.

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या पत्रानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे यांच्यातर्फे निवडण्यात आलेली नगरपालिका व जिल्हापरिषद शाळेंसाठी निवडक वाचनीय पुस्तकांची यांदी

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|---|
| १ | गोष्ट कॉम्प्युटरची | संदीप लांडे | 100 |
| २ | जलऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| ३ | अंतराळ- २ | संदीप लांडे | 150 |
| ४ | रोमांचकारी सफर | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ५ | पेरणी | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ६ | हिऱ्यांची पिशवी | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ७ | करामती प्रकाश | विजय नागरे | 150 |
| ८ | अद्भूताचा शोध | विजय नागरे | 130 |
| ९ | जग बदलणारे ५० शोध | आनंद वाघ | 120 |
| १० | घाबरलेल्या सुषमाची गोष्ट | सुमति लांडे | 130 |
| ११ | प्राणी गायब होऊ लागले | आबा गोविंदा महाजन | 150 |
| १२ | बोधकथा | मृण्मयी पाटील | 100 |
| १३ | संवेदना आणि इतर कथा | बाळ पोतदार | 110 |
| १४ | पीठाचा माठ | संतोष खेडलेकर | 100 |
| १५ | आनंदी गाणी | स्नेहा पाटील | 100 |
| १६ | मुलांसाठी शोर्यकथा | संतोष खेडलेकर | 110 |
| १७ | बिल्लू | श्यामला एस. | 100 |
| १८ | करामती मुंग्या | संज्योत बनूबकोडे | 100 |
| १९ | जलधारा | मृण्मयी पाटील | 100 |
| २० | अशी मोडली खोड | मृण्मयी पाटील | 100 |
| २१ | निसर्ग माझा सवंगडी | संदीप लांडे | 100 |
| २२ | पवन ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २३ | निसर्गाचे संवर्धन का करावे | संदीप लांडे | 200 |
| २४ | सौर ऊर्जा | संदीप लांडे | 130 |
| २५ | शाळा सवंगडी | विजय नागरे | 130 |
| २६ | आमची शाळा | विजय नागरे | 130 |
| २७ | कौशल्य | विजय नागरे | 100 |
| २८ | इवलासा ससा | संज्योत बनूबकोडे | 100 |
| २९ | स्वातंत्र्यसंग्रामाच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ३० | पिंकू आणि सोनू | श्यामला एस. | 100 |
| ३१ | महानायक | संतोष खेडलेकर | 100 |
| ३२ | संस्कार कथामाला | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३३ | देण्याचा आनंद | संज्योत बनूबकोडे | 100 |
| ३४ | सफर जगातल्या आश्चर्याची | संतोष खेडलेकर | 120 |
| ३५ | किलबिल गोष्टी | नामदेव माळी | 150 |
| ३६ | हिम्मत | विजय नागरे | 150 |
| ३७ | बी ची गोष्ट | सुनील भोडगे | 100 |
| ३८ | दोरीची करामत | विजय नांगरे | 100 |
| ३९ | ऐतिहासिक शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 130 |
| ४० | चांगला मित्र | सौ.संज्योत बानुबाकोडे | 100 |
| ४१ | सईचे पंख | विजय नागरे | 150 |
| ४२ | मी अब्दुल कलाम | मृण्मयी पाटील | 100 |
| ४३ | पाण्याविषयी सर्वकाही | संदीप लांडे | 100 |
| ४४ | नाच रे मोरा | सूचित पाटील | 100 |
| ४५ | कावळा काळा कसा झाला | श्यामला एस. | 100 |
| ४६ | रोबोट माझा मित्र | विशाल तायडे | 160 |
| ४७ | ऊद्धट नंदू | श्यामला एस. | 100 |
| ४८ | झाडाची गोष्ट | शाल्मल लांडे | 100 |
| ४९ | चला पावसाच्या पाण्याची बचत करू | संदीप लांडे | 130 |
| ५० | कचरा व्यवस्थापन | संदीप लांडे | 200 |
| ५१ | हूशार बकरी | बाळ पोतदार | 100 |
| ५२ | आपले हरित घर | संदीप लांडे | 100 |
| ५३ | आपली हरित शाळा | संदीप लांडे | 100 |
| ५४ | मालगुंडचा सिद्धू | आनंद वाघ | 100 |
| ५५ | अद्भुत पोषोख | विजय नांगरे | 160 |
| ५६ | सातपुड्याच्या जंगलामध्ये | आबा गोविंदा महाजन | 100 |
| ५७ | रणरागिणींच्या शौर्यकथा | संतोष खेडलेकर | 100 |
| ५८ | बबलू खरेदीला जातो | श्यामला एस. | 100 |
| ५९ | चिंटू नावाचा कोल्हा | श्यामला एस. | 100 |
| ६० | दोन जादूगार | रमेश महाले | 100 |
| ६१ | हरवलेला धबधबा | श्यामला एस. | 100 |
| ६२ | चतुर कोल्हा वेंधळा बोकड | मृण्मयी पाटील | 100 |
| ६३ | दिनेशची समुद्र किनाऱ्यावरील सफर | श्यामला एस. | 100 |
| ६४ | प्राणीसृष्टी भाग-१ | रमेश महाले | 200 |
| ६५ | कागा आणि नारळ | श्यामला एस. | 100 |
| ६६ | दिशा नवोपक्रमाची | ताई पवार | 160 |
| ६७ | नशिबाची साथ | विजय नागरे | 100 |
| ६८ | वृक्षगान | लैला महाजन | 100 |
| ६९ | वृक्षवल्ली आम्हा सोयरे | लीलावती भागवत | 100 |
| ७० | म्हणींचा शोध मनास बोध | म.ना. जोशी | 100 |
| ७१ | एकमेका सहाय्य करू | म.ना. जोशी | 100 |
| ७२ | राजा पिल्लाची गोष्ट | लीलावती भागवत | 100 |
| ७३ | छान छान गोष्टी | रोहिणी कुलकर्णी | 100 |
| ७४ | बछडा | मुकुंद निगवेकर | 100 |
| ७५ | संस्कार गोष्टी | म.ना. जोशी | 100 |
| ७६ | सुबोध कथा | मीरा जाधव | 100 |
| ७७ | उपेक्षित बालके | म.ना. जोशी | 100 |
| ७८ | चोरीची माया | बबन खंडगळे | 100 |
| ७९ | गोष्ट राम्पुरीची | बबन खंडगळे | 100 |
| ८० | टीमटीमणारे तारे | स्नेहलता बावळे | 100 |
| ८१ | १११ बोधकथा | हेमंत गोखले | 100 |
| ८२ | सृष्टीशी जडवू नाते | लीलावती भागवत | 100 |
| ८३ | आदर्श गोष्टी | शोभा जोशी | 100 |
| ८४ | अशीही दिवाळी | वर्षा गडकर | 100 |
| ८५ | स्वप्नाचा पाठपुरावा | वर्षा गडकर | 100 |
| ८६ | म्हणीच्या बोधकथा | म.ना. जोशी | 100 |
| ८७ | मजेदार मज्जा | स्नेहलता बावळे | 100 |
| ८८ | व्यंगावर मात | वर्षा गडकर | 100 |
| ८९ | धाडसी आजी | वर्षा गडकर | 100 |
| ९० | आपले पक्षी-सखे सोबती भाग १ | मंगेश कश्यप | 100 |
| ९१ | आपले पक्षी-सखे सोबती भाग २ | मंगेश कश्यप | 100 |
| ९२ | आपले पक्षी-सखे सोबती भाग ३ | मंगेश कश्यप | 100 |
| ९३ | छोट्यांसाठी मोठ्या गोष्टी | वर्षा गडकर | 100 |
| ९४ | सुसंस्कारीत मनोबल | शोभा जोशी | 100 |
| ९५ | मुल नव्हे देवदूतच | नीला कदम | 100 |
| ९६ | वसा स्वावलंबनाचा | शोभा जोशी | 100 |
| ९७ | गुडबाय छोट्या मित्रा आणि इतर गोष्टी | विनया साठे | 100 |
| ९८ | एक झाड लावू मित्रा | अनंत भावे | 100 |
| ९९ | गोष्टीरूप चाणक्य | राजेंद्र खरे | 150 |
| १०० | माणुसकीचा श्वास | नीला कदम | 100 |
| १०१ | पोषक गोष्टी भाग १ | शोभा जोशी | 100 |
| १०२ | पोषक गोष्टी भाग २ | शोभा जोशी | 100 |
| १०३ | विचार यशाचाच | वर्षा गडकर | 100 |
| १०४ | खरी कमाई | शोभा जोशी | 100 |
| १०५ | नातं | वर्षा गडकर | 100 |
| १०६ | बाल रक्षक कायद्याचे | अविनाश भोंडवे | 100 |

**वरील पुस्तके मागविण्यासाठी समोरील नंबरवर संपर्क करा - मो. ९०११२०१४१४/९८२२५२५४४४**

## आशिया कपसाठी भारतीय संघ दुबईमध्ये दाखल




मुंबई : आशिया कप सुरु होण्यासाठी आता अवघे काही दिवसच उरले आहेत. २०२५ च्या आशिया कपचे सामने युएईमध्ये खेळवले जातील. दुबई इंटरनॅशनल स्टेडियम व्यतिरिक्त, स्पर्धेचे सामने अबू धाबी येथील शेख झायेद स्टेडियममध्ये देखील होतील. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय संघ युएईमध्ये पोहोचला आहे. भारतीय संघ ४ सप्टेंबरलाच भारातहून दुबईसाठी रवाना झाले होते. आशिया कप ९ सप्टेंबर रोजी सुरू होईल तर भारतीय संघ १० सप्टेंबर रोजी आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. गट अ मधील भारताचा पहिला सामना युएई विरुद्ध होणार आहे.

टीम इंडियाने युएईमध्ये पोहोचताच सरावही सुरू केला आहे. खेळाडू दुबईला पोहोचले आहेत आणि शुक्रवारी येथे संघाचे पहिले सराव सत्र झाले. सूर्यकुमार यादव यांच्या नेतृत्वाखालील संघाचे सर्व खेळाडू त्यात सहभागी झाले. या सराव सत्राचे अनेक फोटो आणि व्हिडिओ सोसल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेले पाहायला मिळत आहे. यावेळी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर देखील दिसले. आशिया कपमध्ये पहिल्यांदाच गंभीर भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारेल.

सध्या दुबईमध्ये खूप उष्णता आहे. आशिया कप सुरू होण्यापूर्वी भारतीय खेळाडूंना परिस्थितीशी जुळवून घेण्याचे आव्हान असेल. भारतात सर्वत्र पाऊस पडत असताना, दुबई आणि अबू धाबीमध्ये तीव्र उष्णता आहे. यामुळेच आशिया कप सामन्यांची सुरुवातीची वेळ अर्ध्या तासाने वाढवण्यात आली आहे. तेथील तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. भारताचा पहिला सामना १० सप्टेंबर २०२५ रोजी रंगणार आहे. भारताचा पहिला सामना हा युएईसोबत खेळणार आहे.

भारतीय क्रिकेट संघ शेवटचा ४ ऑगस्ट रोजी मैदानावर दिसला होता. भारत आणि इंग्लंड यांच्यात ओव्हल येथे खेळल्या गेलेल्या कसोटीचा हा शेवटचा दिवस होता. टी-२० बद्दल बोलायचे झाले तर, भारताने वर्षाच्या सुरुवातीला शेवटची कसोटी खेळली. त्यानंतर संघाचा सामना इंग्लंडशी झाला. भारताने ती मालिका सहज जिंकली. आयपीएलमध्ये खेळल्यानंतर भारतीय खेळाडू टी-२० फॉरमॅटपासून पूर्णपणे दूर आहेत.

साप्ताहिक शब्दरुतू - हे पत्र मालक, प्रकाशक सुमती साईनाथ लांडे यांना मुद्रक विजय दत्तात्रय नगरकर यांनी आदित्य प्रिंटर्स, कामगार सदन, क्रॉस मेनरोड, श्रीरामपूर-४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून शब्दालय प्रकाशन, पोस्ट बॉक्स नं.९०, वार्ड नं.७, आयडीया टॉवरजवळ, श्रीरामपूर ४१३७०९, जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक- सुमती साईनाथ लांडे
Total Code - SR.NO./MAG/11/2021